महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्र. : नाविमं / प.उ.मा. / 1266
नागपूर, दि. 24 / 04 / 2024
25

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय** :– इ. 10 वी व 12 वी परीक्षेस शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरीत्या अध्ययन करुन स्वतःच्या जबाबदारीवर विद्यार्थ्यांस प्रविष्ठ होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करणेबाबत.

**संदर्भ** :– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. रा.म / परीक्षा–3 / 1532 दिनांक –18 / 04 / 2024.

उपरोक्त विषयास अनुसरून सुचित करण्यात येते की, इ. 10 वी व इ. 12 वी परीक्षेस शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगिरित्या अध्ययन करुन स्वतःच्या जबाबदारीवर विद्यार्थ्यांस प्रविष्ठ होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करणेच्या अनुषंगाने ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात विषय अध्यापनाची सोय नाही, अशा विषयांना खाजगिरित्या अध्ययन करण्याबाबत खाली दिलेल्या अटीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

1) तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मुल्यमापनाची जबाबदारी संबधिंत शाळा / कनिष्ठ महाविद्यालयावर सोपवावी, तसे हमीपत्र प्रस्तावासोबतच घ्यावे.
2) अशा विषयांना परवानगी घेण्यासाठी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी त्या शैक्षणिक वर्षाच्या 31 ऑगस्टपूर्वी प्रस्ताव पाठवून विभागीय मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
3) सदर प्रस्तावासोबत प्रति विद्यार्थी रु. 2000 / – इतके शुल्क आकारण्यात येईल.
4) फेब्रु / मार्च 2025 परीक्षेपासून प्रस्तावित शुल्क आकारुन विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होऊ शकतात.

तरी सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना उपरोक्त बाब महितीस्तव कळविण्यात येत आहे.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी :–

1) सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.